**निशाणी क्रमांक २६**

**संक्षिप्त फौ.ख. क्र. ८९०/२०१७**
सरकार विरुध्द महेंद्र चौधरी

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ चा शपथेवर जबाब**

मी सत्य प्रतिज्ञावर कथन करतो की,

माझे नाव : **जगमेजय विष्णूपंत पांडे**
माझे वय : ४७ वर्ष
कामधंदा : खाजगी
राहणार : अहिल्यानगर, जयताळा रोड, नागपूर.

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.पी. देशमुख यांचे मार्फत**

१] घटना सन २०१७ मध्ये हिंगणा रोडवर राजीव नगर परिसरामध्ये घडली. त्यावेळी मी रस्त्याच्या कडेला इंटरनेटचे फायबर ऑप्टीकचे काम करत होतो. माझी एक्टीव्हा गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली होती. त्यावेळी एक कार माझ्या पाठी मागून आली व तिने माझ्या एक्टीवा मोटरसायकलला धडक दिली. त्यानंतर ती कार अंदाजे ५० मिटर पुढे जावून धडकली. सदर कारने माझ्या एक्टीव्हा गाडीला धडक दिल्याने माझ्या एक्टीव्हा गाडीचे नुकसान झाले होते. मला त्या कारचा नंबर आठवत नाही. घटनेनंतर पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती. पोलिसांनी माझा बयान घेतला होता. मी कार चालकाला पाहिले नव्हते त्यामुळे मी त्याला ओळखु शकत नाही.

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. धिरज लामसोंगे यांच्या मार्फत**

२] उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

**[ व्ही. आय. शेख ]**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगणा.

ठिकाण : हिंगणा
दिनांक : १३/०१/२०२६